ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ३५ • गुरुवार दि.२९ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

राज्यातील जि.प.व पं.स.च्या प्रलंबित निवडणुकांना सुप्रिम कोर्टाचा हिरवा कंदील

२० जिल्हा परिषदेच्या निवडणुका अंतिम निकालाच्या अधिन होणार

नवी दिल्ली: ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून दीर्घकाळ खडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधिन राहून घेण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे राज्यातील २० जिल्हा परिषदा आणि सुमारे २२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक प्रक्रियेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आता राज्य निवडणूक आयोग निवडणुकीचा कार्यक्रम कधी जाहिर करतो, याकडे राजकीय पक्षांसह इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीमुळे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. ओबीसी आरक्षणाची अंमलबजावणी आणि आरक्षणाची एकूण मर्यादा या मुद्द्यांमुळे कोकण-पालघर, ठाणे, उ.महाराष्ट्र-नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, मराठवाडा- बीड, जालना, नांदेड, हिंगोली, विदर्भ- अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर आदी जिल्ह्यातील जि.प. व पंचायत समितीच्या निवडणुका घेण्यासाठी कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या. या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील तीन सदस्यीय खंडपीठासमोर झाली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अनिश्चित काळासाठी पुढे ढकलता येणार नाहीत, अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही घेतली होती. मे २०२५ मध्ये न्यायालयाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश देताना बांठिया आयोगाच्या अहवालापूर्वी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणाच्या व्यवस्थेनुसार निवडणुका घेण्यास परवानगी दिली होती. मात्र, काही ठिकाणी आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक होत असल्याचा मुद्दा उपस्थित झाल्याने निवडणुकांबाबतचा कायदेशीर पेच कायम राहिला.ओबीसी आरक्षणाच्या अंमलबजावणीत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसह सर्व आरक्षणांची एकत्रित मर्यादा ५० टक्क्यांच्या आत ठेवण्याचा मुद्दा या प्रकरणात महत्त्वाचा आहे. आरक्षणाच्या मर्यादेबाबत न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निर्देशांचे पालन करूनच निवडणूक प्रक्रिया राबवावी लागणार आहे. त्यामुळे संबंधित जिल्ह्यांतील आरक्षणाचे स्वरूप आणि निवडणूक कार्यक्रम निश्चित करताना राज्य निवडणूक आयोगासमोर महत्त्वाचे आव्हान असेल. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या या ग्रामीण भागाच्या विकासातील महत्त्वाच्या संस्था आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण तसेच विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यात त्यांची भूमिका निर्णायक असते. निवडणुका रखडल्याने स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधित्वाचा प्रश्नही चर्चेत राहिला आहे. त्यामुळे निवडणुका झाल्यास ग्रामीण भागातील राजकीय घडामोडींना वेग मिळण्याची शक्यता आहे.आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पुढील प्रक्रिया कशी राबवली जाते, आरक्षणाची अंमलबजावणी कोणत्या पद्धतीने होते आणि राज्य निवडणूक आयोग निवडणुकीचे वेळापत्रक कधी जाहिर करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, निवडणुकांचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाल्याचे स्पष्ट होण्यासाठी न्यायालयाच्या आदेशातील नेमक्या अटी आणि आयोगाची पुढील कार्यवाही महत्त्वाची ठरणार आहे.

नागपूरमधून काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी यांचा दुसऱ्यांदा विजय

नागपूर: नागपूर पदवीधर मतदारसंघातून काँग्रेस व महाविकास आघाडीचे उमेदवार आ.अभिजीत वंजारी यांनी शानदार विजय मिळवला आहे. आ.वंजारी यांनी भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला आहे. हा विजय काँग्रेससाठी महत्त्वपूर्ण राजकीय यश म्हणून पाहिले जात आहे. तर भाजपसाठी हा निकाल नागपूर आणि विदर्भातील आपली राजकीय स्थिती तपासून पाहण्याचे संकेत मानले जाऊ शकतात.

आ.अभिजीत वंजारी यांचा हा सलग दुसरा विजय आहे. २०२० मध्येही अभिजीत वंजारी यांनी नागपूर पदवीधर मतदारसंघातून निवडणूक जिंकली होती. व्यवसायाने वकील असलेल्या अभिजीत वंजारी यांची सुरुवात विद्यार्थी राजकारणातून झाली होती.अभिजीत वंजारी यांना राजकारण वारसाहक्काने मिळाले आहे. ते नागपूरच्या एका राजकीय कुटुंबातील आहेत. अभिजीत वंजारी यांचे वडील गोविंदराव मारोतराव वंजारी दक्षिण नागपूर विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार होते. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत अभिजीत वंजारी यांनीही राजकारणाचा मार्ग स्वीकारला. ते नागपूर विद्यापीठाच्या सिनेट आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्यही राहिले आहेत. अभिजीत वंजारी यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात विद्यार्थी राजकारणातून केली होती. नागपूर हा भाजप व राजसंघाचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जातो. केंद्रीय परिवहनमंत्री नितीन गडकरी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपूर हे होमटाऊन आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघातून नितीन गडकरी यांनी चारवेळा प्रतिनिधीत्व केले होते. भाजपचा गड हा २०२० मध्ये काँग्रेसचे उमेदवार अभिजित वंजारी यांनी जिंकला आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या अटीतटीच्या निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा विजय मिळवून काँग्रेसची ताकद दाखवून दिली आहे.

विधान परिषद निकालावरून महायुतीत कलगीतुरा

मुंबई/प्रतिनिधी-विधान परिषदेतील रिक्त झालेल्या शिक्षक व पदवीधर मतदारसंघांच्या पाच जागांच्या निकालानंतर महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीने तीन, तर महायुतीने दोन जागांवर विजय मिळवला. पाचही जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त करणाऱ्या भाजपला अपेक्षित यश मिळाले नसल्याने विरोधकांनी टीका केली. त्यातच भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेनेवर

पराभवाचे खापर फोडल्याने महायुतीतील वाद अधिकच चिघळला आहे. शिवसेनेचे नेते रवींद्र धंगेकर आणि प्रवक्ते आनंद परांजपे यांनी भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर देत मित्रपक्षालाच सवाल केले. भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी पुण्यातील निवडणुकीवरून शिवसेनेला लक्ष्य केले. महायुतीचा अधिकृत उमेदवार असतानाही शिवसेनेने ऐनवेळी अपक्ष उमेदवार सचिन सानप यांना पाठिंबा दिला. त्यामुळे भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांचे नुकसान झाल्याचा दावा त्यांनी केला. शिवसेनेचे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी भाजपच्या अधिकृत उमेदवाराला मतदान करू नये, असे आवाहन केल्याचा आरोपही बन यांनी केला.मित्रपक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरोधात भूमिका घेतली जात असेल, तर हा गंभीर विषय असल्याचे सांगत त्यांनी धंगेकर यांच्यावर कारवाई होणार का, असा सवाल उपस्थित केला. छत्रपती संभाजीनगरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे पान ४ वर

निर्भीड पत्रकार प्रताप आसबे यांना अखेरचा निरोप

मुंबई/प्रतिनिधी-ज्येष्ठ पत्रकार आणि राजकीय विश्लेषक प्रताप आसबे यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पत्रकारिता आणि सामाजिक चळवळींच्या क्षेत्रातील एक निर्भीड आवाज हरपला. बुधवारी मुंबईतील हिंदुजा रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. गुरुवारी (२९ ऑक्टोबर) दादर येथील शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

आसबे यांच्या अंत्यदर्शनासाठी ज्येष्ठ नेते खा.शरद पवार, राज्याचे अन्न व पुरवठा मंत्री छगन भुजबळ, आ.नीलम गोऱ्हे, माजी मंत्री नवाब मलिक, खा. अनिल देसाई, ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांच्यासह राजकीय, सामाजिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. आसबे यांनी १९८५ मध्ये नवशक्तीमधून पत्रकारितेला सुरुवात केली. त्यानंतर महाराष्ट्र टाइम्समध्ये काम करताना त्यांनी अनेक महत्त्वाच्या विषयांना निर्भीडपणे वाचा फोडली. महाराष्ट्र देशी या सदरातून त्यांनी राज्याच्या राजकारणाचे प्रभावी विश्लेषण केले. निवृत्तीनंतर त्यांनी एबीपी माझा वृत्तवाहिनीसाठी राजकीय विश्लेषक म्हणून काम केले. पत्रकारितेसोबतच ते युक्रांद आणि गिरणी कामगार सभेच्या माध्यमातून सामाजिक चळवळींमध्ये सक्रिय होते. कामगार, शेतमजूर आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांसाठी त्यांनी संघर्ष केला. मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलनातही त्यांनी सहभाग घेतला होता. त्यांच्या निधनाने पत्रकारिता क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत आहे.

मतदार यादीतील घोळाविरोधात किनवटमध्ये काँग्रेसचा निषेध मोर्चा

किनवट/प्रतिनिधी-लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह असणे अत्यंत गरजेचे असताना, मतदार यादीतील संभाव्य अनियमितता आणि मतदारांच्या अधिकारावर होत असलेल्या कथित उल्लंघनामुळे नागरिक व राजकीय वर्तुळात तीव्र चिंता व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर किनवट तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने आज (२९ ऑक्टोबर) निषेध मोर्चा काढून, किनवटच्या सहायक जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मागण्यांचे निवेदन सादर केले. नायब तहसीलदार रामेश्वर मुंडे यांनी मोर्चेकरांचे निवेदन स्वीकारले.नांदेड जिल्ह्यात उद्भवलेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी हेक्टरी एक लाख रुपये तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी केलीय. मतदार यादीतील अनियमितता, दुबार नोंदी आणि पात्र मतदारांची नावे वगळल्याच्या तक्रारींची सखोल तपासणी व निष्पक्ष चौकशी करावी. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता व उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या मागणीसह, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत चौकशी करून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन पाठवले आहे.जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, जिल्हा उपाध्यक्ष के.सूर्यकांतरेड्डी माधवरेडी, के.मूर्ती, सिराज जिवानी, शहर अध्यक्ष गिरीष नेमानिवार, जिल्हा संघटक फसिसउल्ला खान, नंदूलाल उरपे, सुभाषबाबूल नायक राठोड, पान ४ वर

शेतकरी चंद्रकांत शिंदे हत्या प्रकरणातील खाजगी फायनान्सच्या मालकासह तीन जणांना अटक

विशेष तपास पथकाची कारवाई; आरोपींची संख्या ९ वर पोहचली

नांदेड/प्रतिनिधी-व्याजाची रक्कम थकल्याने माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांचे अपहरण करून त्यांची हत्या करणाऱ्या के.एफ. इंटरप्रायजेस खासगी फायनान्सच्या मालकासह तीन जणांना पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथकाने अटक केली आहे. या गुन्ह्यातील अटक केलेल्या आरोपींची संख्या नऊवर पोहचली आहे.

माळकौठा येथील शेतकरी चंद्रकांत शिंदे यांनी के.एफ. इंटरप्रायजेस या खासगी फायनान्सकडून कर्ज घेतले होते. वेळेवर कर्जाच्या रक्कमेची परतफेड चंद्रकांत शिंदे यांना करता आली नाही. त्यामुळे दि.२२ ऑक्टोबर रोजी माळकौठा येथुन के.एफ. खासगी फायनान्समध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी चंद्रकांत शिंदे यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून हिंगोली गेट येथील के.एफ.इंटरप्रायजेस या खासगी फायनान्सच्या कार्यालयात आणले. पैशासाठी चंद्रकांत शिंदे यांना दोन दिवस डांबुन मारहाण करण्यात आली. त्यानंतर चंद्रकांत शिंदे यांचा मृतदेह पंख्याला लटकवलेल्या अवस्थेत आढळून आला. याप्रकरणी वजिराबाद पोलीस ठाण्यात मयत शिंदे यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरुन विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी खासगी फायनान्स कंपनीच्या तीन-चार जणांना अटक केली होती. परंतु या घटनेतील फायनान्सचा मालक व इतर प्रमुख आरोपी फरार झाले होते. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी या गुन्ह्याच्या तपासासाठी नांदेड शहराचे पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वैंजने यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन केले होते. या तपास पथकात तीन पोलीस अधिकारी व सहा कर्मचाऱ्यांचा समावेश होता. विशेष तपास पथक, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग व वजिराबाद पोलीसांनी नांदेड व परभणी येथे कारवाई करुन के.एफ.इंटरप्रायजेस या खासगी फायनान्स कंपनीचा मालक हरप्रितसिंघ उर्फ मंटु नरेंद्रसिंघ मेजर (वय ४०) रा. अबचलनगर, नांदेड, सतपालसिंघ किशनसिंघ खालसा (वय ४७) रा. भगतसिंघ रोड, जुनामोंढा, नांदेड व शेख शोएब शेख महेमुद (वय २१) रा.वर्मानगर रोड, परभणी या तीन जणांना अटक केली आहे. यापूर्वी पोलीसांनी शेख आमेर शेख साहेब हुसेन, इम्रानखान शहाबाजखान, शेख मुदस्सीर शेख खदीर, शेख अहमद उर्फ असलम मो.बशीर, सुमेध शकोजीराव डोईबळे (वय २१) यांना यापूर्वीच अटक केली आहे. आतापर्यंत पोलीसांनी या गुन्ह्यातील ९ जणांना अटक केली असून आरोपींशी संबंधीत के.एफ. इंटरप्रायजेस व नवामोंढा येथील कुबेर फल नागरी सहकारी पतसंस्था या दोन संस्थेची चौकशी केली जात आहे.

क्षुल्लक कारणावरुन तरुणाचा खून

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील नल्लागुट्टाचाळ भागात क्षुल्लक कारणावरुन एका १६ वर्षाच्या मुलाचा तीक्ष्ण हत्याराने वार करुन खून केल्याची घटना बुधवारी रात्री घडली आहे.

धीरज थोरात (वय १६) रा.नल्लागुट्टा चाळ हा बुधवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास घरासमोर थांबला असतांना क्षुल्लक कारणावरुन तरुणाच्या टोळक्याने त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार केला. या घटनेत धिरजचा मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती समजताच वजिराबाद पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

पदवीधरांचा महायुती, आघाडीला धक्का

लोकशाहीत निवडणुका म्हणजे केवळ सत्तेचे गणित नसते, तर जनतेच्या मनातील असंतोष, अपेक्षा आणि राजकीय विश्वासाचे प्रतिबिंब असते. चार राज्यांतील विधान परिषदेच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकांचे निकाल हाच संदेश देणारे आहेत. महाराष्ट्रात पदवीधरांच्या तिन्ही जागांवर महाविकास आघाडीने विजय मिळविला, तर शिक्षकांच्या दोन जागांवर महायुतीने यश संपादन केले. या निकालाने सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षण करण्याची वेळ आणली असून, विरोधकांनाही आपले यश व्यापक जनसमर्थनात रूपांतरित करण्याचे आव्हान दिले आहे.महाराष्ट्रातील पुणे, नागपूर आणि औरंगाबाद पदवीधर मतदारसंघांत महाविकास आघाडीने बाजी मारली. पुणे आणि औरंगाबाद येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाने विजय मिळविला, तर नागपूरमध्ये काँग्रेसचे अभिजित वंजारी विजयी झाले. दुसरीकडे, पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपचे कौस्तुभ गावडे आणि अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे किरण सरनाईक यांनी विजय मिळवून महायुतीची प्रतिष्ठा राखली. त्यामुळे या निकालाकडे एकाच पक्षाच्या विजय-पराभवाच्या चौकटीतून न पाहता मतदारांचा बदलता कल म्हणून पाहणे आवश्यक आहे.या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे बॅलेट पेपरवर झालेले मतदान. मतमोजणीच्या सुरुवातीच्या टप्प्यात महाविकास आघाडीला अपेक्षित यश मिळत नसल्याचे चित्र दिसत असताना भाजपच्या नेत्यांनी ईव्हीएमला दोष देता येणार नसल्याचा सूर लावला. मात्र, पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुका मतपत्रिकांद्वारे होतात, ही बाब राजकीय नेत्यांना माहीत नाही असे नाही. तरीही या प्रक्रियेचा राजकीय प्रचारासाठी वापर करण्याची घाई का करण्यात आली, हा प्रश्न उपस्थित होतो.ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना बॅलेट पेपरवरील निकाल दाखविणे आणि त्यातून विरोधकांना राजकीय टोला लगावणे सोपे असते. परंतु, एका निवडणुकीतील निकालावरून ईव्हीएमबाबतचे सर्व आक्षेप सिद्ध किंवा असिद्ध होत नाहीत. दोन्ही प्रकारच्या मतदानपद्धतींची प्रक्रिया, मतदारांचा सामाजिक आवाका आणि निवडणुकीचे स्वरूप वेगवेगळे असू शकते. त्यामुळे मतदान पद्धतीचा राजकीय सोयीप्रमाणे अर्थ लावण्यापेक्षा प्रत्येक निवडणुकीतील पारदर्शकता, विश्वासार्हता आणि मतदारांच्या निर्णयाचा आदर महत्त्वाचा आहे. लोकशाहीत निकाल अनुकूल असेल तेव्हा प्रक्रिया योग्य आणि प्रतिकूल असेल तेव्हा प्रक्रिया संशयास्पद, अशी दुटप्पी भूमिका कोणालाही शोभणारी नाही.भाजपकडून पदवीधर मतदारसंघांत पूर्वी आपली ताकद नव्हती, असा युक्तिवाद केला जात असला, तरी राजकीय इतिहासाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. नागपूर हा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा पारंपरिक राजकीय प्रभाव असलेला मतदारसंघ मानला जातो. याच मतदारसंघात काँग्रेसने यापूर्वी विजय मिळविला होता. पुणे पदवीधर मतदारसंघातही सत्ताधारी पक्षाला आपली पकड कायम राखता आलेली नाही. त्यामुळे पदवीधर मतदारांचे मतदान हे केवळ पक्षाच्या संघटनशक्तीवर किंवा सत्तेच्या प्रभावावर ठरत नाही, हे स्पष्ट होते. या निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मिळविलेले यश विशेष उल्लेखनीय आहे. पुणे आणि औरंगाबाद या दोन्ही पदवीधर मतदारसंघांतील विजयामुळे पक्षाला राजकीय बळ मिळाले आहे. राज्यातील सत्तासमीकरणे, पक्षफुटी आणि संघटनात्मक आव्हाने यांमध्येही मतदारांपर्यंत पोहोचण्याची क्षमता पक्षाने दाखवून दिली. मात्र, या विजयाला राज्यभरातील सार्वत्रिक जनमताचा कौल समजणे घाईचे ठरेल. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांचा मतदारवर्ग मर्यादित व विशिष्ट स्वरूपाचा असतो. या मतदारांच्या प्रश्नांवर सातत्याने काम केल्यासच या यशाचे व्यापक राजकीय भांडवल करता येईल. शिक्षक मतदारसंघांतील महायुतीच्या विजयही दुर्लक्षित करता येणार नाही. शिक्षकांच्या प्रश्नांवर सरकारची भूमिका, शिक्षण क्षेत्रातील धोरणे, वेतन, अनुदाने आणि सेवाविषयक अडचणी या मुद्द्यांचा निकालावर परिणाम होत असतो. त्यामुळे शिक्षकांच्या दोन जागांवरील विजयाने सरकारला संपूर्ण समाधान मानण्याऐवजी या प्रश्नांची उत्तरे देण्याची जबाबदारी अधिक वाढली आहे.अखेरीस, निवडणुकीतील विजय हा सत्तेचा परवाना नसतो आणि पराभव हा राजकीय अस्ताचा पुरावा नसतो. मतदारांचा कौल समजून घेणे, चुका सुधारणे आणि लोकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे, हीच राजकीय पक्षांची खरी कसोटी आहे. बॅलेट पेपर असो वा ईव्हीएम, मतदारांचा विश्वास जिंकणे हेच अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे. मतपेटीतून मिळालेला संदेश ऐकण्याऐवजी प्रतिस्पर्ध्याला टोमणे मारण्यातच राजकीय ऊर्जा खर्च होत असेल, तर लोकशाहीच्या या परीक्षेत कोणालाही पूर्ण गुण मिळणार नाहीत.

'गेट टू गेदर'चे शालेय जीवनात महत्व काय?

अंकुश शिंगाडे
नागपूर

गेट टू गेदरचं शालेय जीवनात महत्व काय? हे शब्दात मांडणं कठीण आहे. तो क्षण जो अनुभवतो. त्याला खरंच स्वर्गप्राप्तीची अनुभूती प्राप्त होत असते. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.तो गेट टू गेदरचा दिवस. त्या दिवशी जुने विद्यार्थी शाळेला भेट द्यायला आले होते. त्यांनी एक दिवस शाळेत राहून आपल्या गतकाळातील शाळेचा अनुभव घेतला.नेहमीप्रमाणेच शाळा भरली. ज्यात संगीतखुर्ची व नृत्य यांचा समावेशही करण्यात आला होता. जेवनखावण वैगेरे सर्व काही होतं.

तो गेट टू गेदरचा दिवस. त्या दिवशी सर्व मुलं शाळेत आली. त्यांनी शाळा सजवली. जसा आपल्या घरी वाढदिवस साजरा करतो. तशीच शाळा सजावट करण्यात आली. तसंच शाळेचं सुशोभन करण्यात आलं. त्यानंतर भाषणं झाली व भाषणात एक मुलगी म्हणाली, 'माझी अंतिम इच्छा होती की मला माझ्या दहावीच्या शाळेत एक दिवस तरी जायचं आहे. ती माझी अंतिम इच्छा आज पुर्ण झाली. आता कोणतीच इच्छा बाकी उरलेली नाही. तसं बऱ्याच दिवसांपासून वाटत होतं की जुन्या शाळेत एखाद्या दिवशी तरी जावं. अनुभवावा तो दिवस. अन् आज अगदी तसंच घडलं.'अंतिम इच्छा...अंतिम इच्छा तेव्हाच केली जाते. जेव्हा आपल्याला सगळं मिळतं आणि एक इच्छा बाकी असते. तसंच त्या मुलीला वाटलं.आपल्या सर्वसाधारण इच्छा असतात की आपलं शिक्षण पुर्ण व्हावं. आपला विवाह व्हावा. चांगला पती मिळावा. सासर चांगलं मिळावं. त्यातच सासूसासरे चांगले मिळावे. मुलंबाळं चांगली निघावी. तशी तिची ती अंतिम इच्छा. तिला सगळं मिळालं असेल कदाचित. परंतु शाळेत येवून एक दिवस आनंदाचा घालवायचा असेल. तो तिला घालवायला मिळाला. म्हणजेच तिची इच्छा पुर्ण झाली. जिला तिनं एक नाव दिलं, अंतिम इच्छा.

इच्छा...अंतिम इच्छा बऱ्याच असतात. त्या इच्छा कोणी मृत्यूच्या वेळेस करतात तर कोणी मधातही करु शकतात. बरेच जण यात गैरसमज ठेवतात. असं मानलं जातं की आपली संपण्याची वेळ येते. तेव्हा अंतिम इच्छा केली जाते. विचारात घेतली जाते. परंतु तसं काही नाही. अंतिम इच्छेबाबत आपल्या मन जेव्हा विचार करायला लावतं व वेगवेगळे प्रश्न आपल्या मनात जेव्हा निर्माण होतात. तेव्हा त्यावर उपाय म्हणून ही इच्छा केली जाते. जी पुर्ण व्हावी असं वाटत असते आणि ती जेव्हा पुर्ण होते. तेव्हा असीम असा आनंद प्राप्त होतो. त्याला अंतिम इच्छा म्हणतात. तशी तिची अंतिम इच्छा. ती अंतिम इच्छा तशी आजच संपणार नाही आणि संपूही नयेच. मात्र तिच्या त्या बोलण्यावरुन कळलं की मुलांची आणि खासकरुन विद्यार्थ्यांची अंतिम इच्छा असते आपल्या जुन्या शाळेत जाणे. आपला एक दिवस त्या शाळेत घालवणे. ज्यात तोच एक दिवस जर आपल्या वाट्याला आल्हाददायक व उत्साहवर्धक पद्धतीनं आला तर त्याचं मूल्यांकन आणि सीमांकन करणं कठीण जातं. तो आनंद शब्दातून व्यक्त करता येत नाही. त्याचं मोजमापही करता येत नाही. तेच त्या दिवशी घडलं. जे स्वप्न नव्हतं तर सत्य होतं. तेच अंतिम सत्य आणि तीच अंतिम इच्छाही होती.

प्रत्येकाची दहावीपर्यंतचं शिकलेल्या शाळेत जाणे. हे इच्छा म्हणजे अंतिम सत्यच आहे म्हणजे प्रत्येकाची इच्छा विशेषतः प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंतिम इच्छा तशाच असू शकतील. तशा अंतिम इच्छा वेगवेगळ्या असतात. हे सांगायला नकोच. फाशावर जाणाऱ्या लोकांनाही प्रत्येकाच्या अंतिम इच्छा विचारल्या जातात. ज्यात त्या इच्छेची प्रतिपुर्ती केली जाते.अंतिम इच्छेबाबत सांगायचं झाल्यास अलिकडील काळात अशा अंतिम इच्छेला शालेय जीवनात अतिशय महत्व प्राप्त झालेलं आहे. शाळेतून शिकून गेलेल्या मुलांना नेहमी वाटत असतं की आपण आपल्या शाळेत जावू. तिथं आपल्या शाळेत शिकणाऱ्यादरम्यानचा एक दिवस अनुभवू. तसंच घडलं त्या दिवशी व त्या दिवशी तोच दिवस अनुभवण्यासाठी फार दुरदुरुन मुलं मुली आले. ज्यांनी शाळेत आनंद अनुभवला.शाळेत जसे विद्यार्थी आले होते कार्यक्रमाला. तसेच त्यांचे शिक्षकही आले होते. जे निवृत्त झाले होते कितीतरी वर्षापुर्वी. कोणी खरंच चालता येण्यासारखे नव्हतेच. तरीही ते आले होते व तेही आपल्या शाळेदरम्यानचा दिवस अनुभवत होते.

शाळेचं हे एकत्रीपण. ते एकत्रीपण वाखाणण्याजोगंच असतं. कारण बरीच वर्ष झालेली असतात आपल्या शाळा सोडण्याला. ज्यातून आठवण येत असते शाळेची. सारखी हूहूर लागलेली असते. अशातच जेव्हा एखादा प्रसंग उद्भवतो, शाळेत येण्याचा. तेव्हा अगदी बरं वाटत असतं. मग ओढ निर्माण होते शाळेची आणि अचानक पावलं वळतात. ती पावलं कितीही आपण दूर असो. कितीही आपल्याला खर्च येवो. कितीही रस्त्यावर संकटं येवो. आपण सर्व त्या संकटांवर मात करुन शाळेत येत असतो. ज्यातून शाळेत आल्यानंतर जेव्हा आपण शाळेचा गतकाळातील अनुभव अनुभवतो. तेव्हा अगदी हायसं वाटतं. वाटत असतं की असले क्षण वारंवार यावेत. परंतु त्याला बंधन असतं. परंतु असले क्षण अनुभवण्यासाठी जी इच्छा निर्माण होते. त्या इच्छेलाच आपण अंतिम इच्छाही म्हणू शकतो. हे सत्य आहे. दहावीपर्यंतचं आपलं शिक्षण. ज्यातून दंगामस्ती करीत करीत मुलं एकेक पायरी चढत असतात. मग अंतिम वर्ष उजाळतं व निरोप समारंभ येतो. तेव्हा या शाळेत कधीच यायला मिळणार नाही. हे क्षण कधीच अनुभवायला मिळणार नाही. असं वाटून दुःख होतं. जे दुःख शब्दात व्यक्त करता येत नाही. दहावी झाल्यानंतर पुढे कितीही शिकलो, फार मोठ्या पदावर गेलो, तरी तो दहावा वर्ग व त्या वर्गात केलेली कृत्य अर्थात दंगामस्त्या सतत आठवत असतात. त्या आठवल्या की गहिवरुन येतं. वाटतं की एखाद्यावेळेस आपण परत शाळेत जावं. शाळेचे क्षण अनुभवावे. परंतु तसं घडत नाही. अन् हे जेव्हा घडतं. तेव्हा बऱ्याच प्रमाणात आनंद होतो. ज्या आनंदासाठी दहावी झाल्यानंतर आपण तळपत असतो. असा असीम आनंद अनुभवावयास मिळाला की विद्यार्थी भावूक होतात. तसेच शिक्षकही. एक शिक्षक यावर म्हणाले की हा आम्हाला पुरस्कारच आहे.

पुरस्कार...शिक्षकांच्या जीवनात पुरस्काराला तेवढे महत्व नाही. पुरस्कार हा त्या शिक्षकांच्या चांगल्या कार्याची पावती होवूच शकत नाही. कारण सर्वच शिक्षक हिरीरीने कामे करतात व सर्व शिक्षक तसं पाहिल्यास पुरस्काराचे भागीदार ठरतात. तसं पाहिल्यास सर्वच शिक्षक हे अपुर्ण असतात. ते जीवनभर विद्यार्थीच असतात. त्यांच्यात पुर्णत्व तेव्हाच येतं, जेव्हा त्याचे माजी विद्यार्थी त्याला भेटायला येतात. भेटतात. त्या शिक्षकांचे सुखदुःख विचारतात. ते दूर करण्याचा प्रयत्न करतात नव्हे तर त्यांना एखादं बक्षीस देवून त्यांचा गौरवही करतात. ती गोष्ट शिक्षकांच्या जगण्याला, जीवनाला व त्यांच्या असण्याला नव्हे तर त्यांच्या अस्तित्वाला लाभदायी ठरणारी असते नव्हे तर त्याच्या अपुर्णतेस आकार देणारी असते. हे तेव्हाच घडतं, जेव्हा असे गेट टू गेदरचे कार्यक्रम होतात. तसे कार्यक्रम आयोजित केले जातात. आयोजित करण्यात येतात.

महत्वाचं सांगायचं झाल्यास गेट टू गेदरचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. प्रत्येक विद्यार्थ्याने शाळेतून गेल्यानंतर कालांतरानं का होईना, शाळेत यावे. आपल्या शिक्षकांना भेट द्यावी. आपल्या शिक्षकांचे हालहवाल विचारावेत. जेणेकरुन शिक्षकांनाही बरे वाटेल. तसाच एखादा स्नेहमेळाव्याचा कार्यक्रम घडवता आला तर घडवावा. कारण शिक्षक म्हणून शिकविणारा घटक हा आपल्या विचारानं कितीही पुढे गेला तरी त्यास पुर्णत्व प्राप्त होत नाही. त्याला पुर्णत्व प्राप्त होण्यासाठी गरज पडते, त्यानं शिकविलेल्या गतकाळातील माजी विद्यार्थ्यांची. ते ज्या शिक्षकांना भेटत असतील, तो शिक्षक नशीबवान असतो व त्यालाच पुर्णत्व प्राप्त होतं. तसंच विद्यार्थ्यांचंही आहे. ज्या विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षक जर त्या विद्यार्थ्यांना भेटले असतील भविष्यात. तर तो विद्यार्थी खरंच नशीबवान असतो. ते भेटणं म्हणजे त्याला अंतिम इच्छा पुर्ण झाल्यासारखं वाटते नव्हे तर तो आनंद गगणात मावेनासा असतो. त्या आनंदाचं कधीच मोजमाप करता येत नाही. म्हणूनच गेट टू गेदरला शालेय जीवनात अतिशय महत्वाचे स्थान आहे. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. हे तेवढंच खरं.

सुमेधबोधी बुद्ध विहारात वर्षावास समाप्ती कार्यक्रम उत्साहात

उमरखेड/प्रतिनिधी- येथील सुमेधबोधी बुद्ध विहारात आषाढ पौर्णिमेपासून अश्विन पौर्णिमेपर्यंत सुमारे तीन महिने चाललेल्या वर्षावास-निमित्त आयोजित करण्यात आलेला धम्म ग्रंथ वाचन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

या वर्षावास कालावधीचे औचित्य साधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे सामूहिक वाचन व धम्म प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. हे वाचन श्रीरंग कांबळे यांच्या प्रभावी वाणीतून संपन्न झाले. तीन महिने अखंडपणे चाललेल्या या ज्ञानयज्ञात उपासक-उपासिकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाचे आयोजन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या अध्यक्षा केशरबाई पाईकराव यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. त्यांना रंजना आळणे, मायादेवी हापसे, अनिता पाटील, गयाबाई वाठोरे, शोभा ठोके, शकुंतला लोणे, दीक्षा खंदरे, विद्या जमदाडे, सुरेखा कांबळे, संगीता बरडे, अनुराधा निथळे, श्रद्धा राऊत, तिषा काळबांडे, निता दामोधर, कविता शिंगणकर, नगरसेविका कविता काळबांडे आदी महिला मंडळाच्या सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

एफएफएस ॲपद्वारे नांदेड जिल्ह्यात तीन हजार ५५३ शेतकऱ्यांची खतासाठी नोंदणी

नांदेड/प्रतिनिधी- शेतकऱ्यांना आवश्यक खते सुलभतेने उपलब्ध व्हावीत, खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढावी आणि खत खरेदीसाठी होणारी गर्दी टाळता यावी, यासाठी केंद्र शासनाने फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल (एफएफएस) हे प उपलब्ध करून दिले आहे. या सुविधेचा नांदेड जिल्ह्यातील शेतकरी लाभ घेत असून, आतापर्यंत ३ हजार ५५३ शेतकऱ्यांनी ९२८ मेट्रिक टन खतासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी या सुविधेचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी द. रा. कळसाईत यांनी केले आहे.

केंद्र शासनाची ही डिजिटल प्रणाली महाराष्ट्रात २२ ऑक्टोबरपासून लागू झाली आहे. शेतकऱ्यांना मोबाईलमधील प्ले स्टोअरवरून एफएफएस ॲप डाउनलोड करून आपल्या परिसरातील खत विक्री केंद्रांवर उपलब्ध असलेली खते, त्यांचा साठा आदी माहिती घरबसल्या मिळविता येते. आवश्यक खताची ऑनलाइन नोंदणी केल्यानंतर संबंधित विक्रेत्याकडून खत खरेदी करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे खत खरेदीसाठी दुकानांबाहेर रांगा लावण्याची गरज कमी होणार आहे. एफएफएस प्रणालीमुळे खत विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. खतांची छापील किमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे तसेच अनुदानित खतांसोबत इतर कृषी निविष्ठांची खरेदी करण्याची सक्ती करणे यांसारख्या प्रकारांना आळा घालण्यास या प्रणालीची मदत होईल. ऑनलाइन नोंदणीमुळे खत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता वाढून शेतकऱ्यांना आवश्यक खत उपलब्धतेची माहिती वेळेत मिळू शकेल. शेतकऱ्यांनी एफएफएस पवर खताची नोंदणी केल्यानंतर ७२ तासांच्या आत संबंधित खताची उचल करणे बंधनकारक आहे. त्यामुळे नोंदणी करताना खताची प्रत्यक्ष गरज, आवश्यक प्रमाण आणि खरेदीसाठी उपलब्ध असलेला वेळ यांचा विचार करावा. तसेच पचा वापर करताना आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकावर येणाऱ्या एकवेळच्या संकेतांकाद्वारे (ओटीपी) पडताळणी केली जाते.

पदवीधर निवडणुकीत डॉ.प्रतापसिंह पाटील यांच्या विजयाचा जल्लोष

मुखेड/प्रतिनिधी- मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत महाविकास आघाडी (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-श. प.) चे उमेदवार डॉ.प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आहेत. या विजयाबद्दल मुखेड शहरात महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून जल्लोष साजरा केला.

या विजयाचे औचित्य साधून महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मुखेड व परिसरातील पदवीधर मतदारांनी डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने मतदारांचे आभार मानण्यात आले. या जल्लोष प्रसंगी प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ. श्रावण रॅपनवाड, शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर, संभाजी पा.उन्द्रीकर, बालाजी बंडे, केलास माधसवार, ॲड. लक्ष्मण सोमवारे, शादुल होनवडजकर, विद्याधर पा. साखरे, एम.आर. गोपनर, सुभाष श्रीमंगले, प्रकाश निमलवाड, बालाजी वाडेकर, तुकाराम सुडके पाटील, गौस सलगरकर यांच्यासह महाविकास आघाडीतील विविध घटकांचे प्रमुख पदाधिकारी,कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
मुख्यसंपादक-प्रदीप नागापूरकर, प्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
सहसंपादक-अविनाश पाटील, प्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

दुष्काळी अग्रीम मदतीतून बँकांना कर्जवसुली करता येणार नाही

जिल्हा प्रशासनाचे बँकांना निर्देश

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आल्याने जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ही मदत जमा करण्यात येणार आहे. या अग्रीम मदत रकमेतून बँकांनी कोणत्याही प्रकारच्या कर्जाची अथवा तत्सम स्वरूपाची वसुली किंवा कपात करू नये, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

सन २०२६ च्या खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या निर्णयानुसार पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये अग्रीम मदत देण्यात येणार आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा आणि त्यांना शेती व कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी मदत व्हावी, या उद्देशाने शासनाकडून अग्रीम अनुदान देण्यात येत आहे. या मदतीचा संपूर्ण लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करून बँकांनी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणाऱ्या अग्रीम मदत रकमेतून कोणत्याही प्रकारची कर्जवसुली अथवा अन्य कपात करू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.जिल्ह्यातील सर्व बँकांनी या निर्देशांची गंभीरतेने दखल घेऊन त्याची अंमलबजावणी करावी. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून देण्यात येणारी अग्रीम मदत कोणत्याही कपातीशिवाय पात्र शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

कंधार तालुक्यात अडीच हजार लाभार्थी अपात्र

धान्याचा इष्टांक उपलब्ध;पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा-विनोद पावडे

कंधार/प्रतिनिधी-सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांनाच शासकीय धान्याचा लाभ मिळावा, या उद्देशाने मिशन सुधार योजनेंतर्गत करण्यात आलेल्या छाननीत कंधार तालुक्यातील सुमारे अडीच हजार लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. यामध्ये उत्पन्न जास्त असलेले तसेच शासकीय नोकरीत असलेल्या लाभार्थ्यांचा समावेश आहे.

दरम्यान, तालुक्यातील पात्र व गरजू नागरिकांसाठी अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत धान्याचा इष्टांक उपलब्ध असून, गोरगरीब लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुरवठा निरीक्षण अधिकारी विनोद पावडे यांनी केले आहे. शासनाच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणून अन्नधान्याचा लाभ गरजू कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यासाठी लाभार्थ्यांची पात्रता तपासण्यात येत आहे. या छाननी प्रक्रियेत कंधार तालुक्यातील सुमारे २,५०० लाभार्थी अपात्र ठरविण्यात आले आहेत. संबंधित लाभार्थ्यांचे उत्पन्न अधिक असणे तसेच काही लाभार्थी शासकीय सेवेत असणे, ही अपात्रतेची कारणे असल्याची माहिती पुरवठा विभागाकडून



देण्यात आली. या प्रक्रियेमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्रतेनुसार लाभार्थ्यांची निश्चिती करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यामुळे शासनाच्या अन्नधान्य योजनेचा लाभ गरजू आणि पात्र कुटुंबांपर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

कंधार तालुक्यातील पात्र लाभार्थ्यांसाठी अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत धान्याचा इष्टांक उपलब्ध आहे. यामध्ये अंत्योदय योजनेचे ७५ आणि प्राधान्य कुटुंब गटाचे ८,७५० युनिट धान्याचे इष्टांक उपलब्ध असल्याची माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी विनोद पावडे यांनी दिली. या योजनेंतर्गत पात्र शिधापत्रिकाधारकांना शासनाच्या नियमानुसार धान्याचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि गोरगरीब कुटुंबांनी आपल्या शिधापत्रिकेच्या पात्रतेनुसार जवळच्या रास्त भाव दुकानातून धान्य प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शासकीय अन्नधान्य वितरण योजनेचा उद्देश गरजू कुटुंबांना अन्नसुरक्षा उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांनी धान्य वितरणाबाबत माहिती घेऊन निर्धारित कालावधीत धान्याचा लाभ घ्यावा. धान्य वितरणा संदर्भात काही अडचण असल्यास संबंधित रास्त भाव दुकानदार किंवा पुरवठा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहनही पावडे यांनी केले आहे.

लॉन टेनिस स्पर्धेत सायन्स कॉलेजचे विजेतेपदावर वर्चस्व

नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सायन्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने सदाशिव पाटील क्रीडा संकुल येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन लॉन टेनिस स्पर्धेत सायन्स कॉलेज, नांदेडच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत विजेतेपद पटकावले. एमजीएम कॉलेज, नांदेडने उपविजेतेपद, तर एस.जी.एस. कॉलेज, नांदेडने तृतीय स्थान मिळविले.

स्पर्धेचे उद्घाटन नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सचिव सौ. शामल पत्की यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे होते. प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर कदम, प्रा. राहुल टिचकुले, उपप्राचार्य डॉ. अरुणा शुक्ला आणि प्रा. एकनाथ खिल्लारे उपस्थित होते.स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात सेवानिवृत्त प्राध्यापक व सामाजिक कार्यकर्ते शिवदास हेमंत, पत्रकार गोविंद मुंडकर, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, डॉ. बाबुराव घायाळ आणि डॉ. धरमसिंग जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्या संघांना गौरविण्यात आले.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागप्रमुख डॉ. अश्विन बोरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. रंजन राठोड, अब्दुल राफे आणि केशव कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.सायन्स कॉलेजच्या या यशाबद्दल नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मा. सीए डॉ.प्रवीण पाटील सर उपाध्यक्ष अँड मा. प्रफुल अग्रवाल सर सहसचिव अँड मा. प्रदीप नागपूरकर सर सायन्स कॉलेज सीडीसी चेअरमन मा. दीपनात पत्की सर महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि क्रीडाप्रेमींनी विजेत्या संघाचे अभिनंदन केले.

धर्माबादमध्ये अनधिकृत सावकारीला चाप बसणार;प्रशासनाचा कडक इशारा

धर्माबाद/प्रतिनिधी-अनधिकृत सावकारी आणि बेकायदेशीर वित्तीय व्यवहारांविरोधात कृषी उत्पन्न बाजार समिती प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे.बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत सावकारी,खासगी फायनान्स किंवा नोंदणीविना मायक्रो फायनान्सचे व्यवहार आढळल्यास संबंधित व्यक्ती, फर्म किंवा एजंटवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,असा इशारा प्रशासक अनिल चव्हाण यांनी दिला आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असताना अनधिकृत सावकारीच्या व्यवहारातून त्यांच्या अडचणींचा गैरफायदा घेवून त्यांची पिळवणूक करण्यात येत असल्याचे प्रकार पहावयास मिळत आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेवून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक संकट ओढवू नये, यासाठी प्रशासनाकडून दक्षता घेतली जात आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड येथील शाहूराज हिरे यांनी जिल्ह्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या सचिवांची बैठक घेऊन बाजार समितीच्या आवारात अवैध सावकारीचे व्यवहार होणार नाहीत, यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात अनधिकृत आर्थिक व्यवहार सुरू असल्याची माहिती किंवा तक्रार असल्यास शेतकऱ्यांनी तातडीने कृषी उत्पन्न बाजार समिती, धर्माबाद कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासक अनिल चव्हाण व सचिव चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.अनधिकृत आर्थिक व्यवहारांवर प्रत्यक्षात किती प्रभावी कारवाई होते आणि शेतकऱ्यांना आर्थिक पिळवणुकीपासून कितपत दिलासा मिळतो, याकडे धर्माबादमधील शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

'एआयएलयु'च्या राज्य कमिटीवर ॲड.मिलिंद सर्पे

किनवट/प्रतिनिधी-ऑल इंडिया लॉयर्स युनियनच्या (एआयएलयु) महाराष्ट्र राज्याच्या चौथ्या अधिवेशनात ॲड.मिलिंद सर्पे यांची राज्य कमिटी सदस्यपदी निवड करण्यात आली. पुण्यातील कोथरूड येथील गांधी भवनात नुकतेच हे अधिवेशन पार पडले.

अधिवेशनाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ घटनातज्ज्ञ प्रा.उल्हास बापट यांनी भारतीय लोकशाहीचे भविष्य वकिलांच्या भूमिकेशी जोडले असून, संविधानाची मूलभूत रचना, धर्मनिरपेक्षता, संघराज्यवाद, संसदीय लोकशाही आणि न्यायपालिकेचे स्वातंत्र्य यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी वकिलांची असल्याचे सांगितले. अधिवेशनात वकिलांच्या विविध प्रश्नांसह सहा ठराव मंजूर करण्यात आले. कनिष्ठ वकिलांना स्टायपेंड देणे, वकिलांसाठी स्वतंत्र संरक्षण कायदा करणे, निवृत्तीनंतर सामाजिक सुरक्षा देणे, न्यायालयीन पायाभूत सुविधा सुधारणे, मुंबईत सर्वोच्च न्यायालयाचे प्रादेशिक खंडपीठ स्थापन करणे तसेच संविधान, लोकशाही व पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व्यापक जनजागृती करण्याच्या मागण्यांचा त्यात समावेश आहे. अधिवेशनात नवीन महाराष्ट्र राज्य कमिटीची निवड करण्यात आली असून ॲड.चंद्रकांत भोजगर यांची अध्यक्षपदी, ॲड.रवींद्र भवार यांची सरचिटणीसपदी, तर ॲड.सचिन गंडले यांची खजिनदारपदी निवड झाली. ॲड.बाबासाहेब वावळकर व ॲड.विशाल जाधव यांची उपाध्यक्षपदी, तर ॲड.प्रदीप साळवी, ॲड.विश्वास अवघडे व ॲड.संजय पांडे यांची संयुक्त सचिवपदी निवड झाली. राज्य कमिटी सदस्य म्हणून ॲड.अनिल वासम, ॲड.रफिक शेख, ॲड.सुहास गायकवाड, ॲड. दीपक विश्वकर्मा, ॲड.ओ.पी.सिंह, ॲड.शंकर बादावाड, ॲड.मिलिंद सर्पे, ॲड.सुरेश वाघचौरे, ॲड.रवींद्र शिरसाट, ॲड.मोहिते, ॲड.सुधीर गावडे, ॲड.नितीन पाटील, ॲड.स्वर्णांशु शेखर, ॲड.अनिल मिसाळ व ॲड.विजय फुलकर यांची निवड करण्यात आली. संविधानिक मूल्ये, न्याय, समता आणि धर्मनिरपेक्षतेच्या संरक्षणासाठी तसेच वकिलांच्या व्यावसायिक हक्कांसाठी संघटितपणे काम करण्याचा निर्धार अधिवेशनात व्यक्त करण्यात आला.

दर्गाहच्या ३५ एकर जमिनीच्या संरक्षणाला बळ;तात्पुरता मुतवल्ली बरखास्त

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील खडकपुरा येथील दर्गाह दुल्हा शाह रहमान शहीद व मस्जिदीच्या सेवा-शर्तीवर बहाल करण्यात आलेल्या इनामी जमिनीच्या संरक्षणासाठी सुरू असलेल्या संघर्षाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे. वक्फ महामंडळाच्या २५ ऑगस्ट रोजीच्या आदेशानुसार संबंधित तात्पुरत्या मुतवल्लीला बरखास्त करण्यात आल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली.

अंदाजे ३५ एकर जमिनीच्या कथित गैरव्यवहारांबाबत स्थानिक दर्गाह व मस्जिद समितीने २०१५ पासून तक्रारी करून सातत्याने पाठपुरावा केला होता. या कारवाईमुळे गेल्या ११ वर्षांपासून न्यायासाठी लढा देणाऱ्या नागरिकांनी समाधान व्यक्त केले. स्थानिकांच्या माहितीनुसार, या जमिनीवर कथित अनधिकृत ताबे आणि गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी संबंधित यंत्रणांकडे करण्यात आल्या होत्या. दर्गाहच्या जमिनीचे संरक्षण करून तिचा वापर निर्धारित उद्दिष्टांसाठी व्हावा, अशी नागरिकांची मागणी आहे.दर्गाह दुल्हा शाह रहमान शहीद यांच्या १४८ व्या वार्षिक संदल व उर्स मुबारकनिमित्त परिसरातील नागरिकांनी जमिनीचा उपयोग तरुणांच्या शिक्षणासाठी, रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी तसेच विधवांना आर्थिक मदत देण्यासाठी करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यासाठी वक्फ महामंडळाला सहकार्य करण्याचेही ठरल्याचे सांगण्यात आले.या प्रकरणात सहकार्य करणारे मुख्यमंत्री, अल्पसंख्याक विभाग, लोकप्रतिनिधी, महसूल विभाग आणि पत्रकार बांधव यांचे स्थानिक नागरिकांनी आभार मानले. तसेच वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, मुख्य कार्यकारी अधिकारी फैय्याज खान आणि संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही आभार व्यक्त केले. दरम्यान, जमिनीचे अधिकृत क्षेत्रफळ आणि कथित गैरव्यवहारांबाबतची माहिती संबंधित कागदपत्रांद्वारे पडताळणे आवश्यक आहे.

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015255

जाहीरनामा

सुनीताबाई नरसिंगराव शेरी यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00017753 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे कैलास बळीराम पाटील यांचे ऐवजी श्रीमती सुनीताबाई नरसिंगराव शेरी हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : ०६/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000013528

जाहीरनामा

प्रल्हाद शेषेराव बोडके यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00011784 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे मनोरमा परशुराम केरले यांचे ऐवजी श्री.प्रल्हाद शेषेराव बोडके हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : १६/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000014485

जाहीरनामा

कृष्णा सुर्यकांत चिंतलवार यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00002621 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे पूजा प्रशांतसिंह चौहाण यांचे ऐवजी श्री.कृष्णा सुर्यकांत चिंतलवार हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015254

जाहीरनामा

शिवराज माधवराव चेंडके यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00000702 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे रमेश मष्णाजी कलेटवार यांचे ऐवजी श्री.शिवराज माधवराव चेंडके हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यतिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015250

जाहीरनामा

धनंजय व्यंकटराव पाटील यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00018195 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे उमाकांत हणमंराव सुवर्णकार यांचे ऐवजी श्री धनंजय व्यंकटराव पाटिल हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यतिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015252

जाहीरनामा

योगिता बालाजी जाधव यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00018199 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे उमाकांत हणमंराव सुवर्णकार यांचे ऐवजी श्रीमती योगिता बालाजी जाधव हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015251

जाहीरनामा

महेश संभाजीराव देशमुख यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00018198 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे उमाकांत हणमंराव सुवर्णकार यांचे ऐवजी श्री. महेश संभाजीराव देशमुख हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद
करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015253

जाहीरनामा

संगीता प्रकाश मदने यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00017006 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/वारसाच्या आधारे मनोजकुमार विठ्ठलराव दोंतुलवार यांचे ऐवजी श्रीमती संगीता प्रकाश मदने हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

गोकुंद्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

पोलीस निरीक्षकांच्या बदलीसाठी बहुपक्षीय नेते एकवटले

किनवट/प्रतिनिधी- पूर्ववैमनस्यातून गोकुंद्यात दोन गटांत पहिल्या दिवशी झालेल्या वादानंतर पोलिसांनी सतर्कता न दाखविल्यानेच दुसऱ्या दिवशी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस निरीक्षक नाकाम ठरले आहेत. त्यांच्या बदलीसाठी बहूपक्षीय नेत्यांचा एकमुखी सूर निघाला असून जिल्हा पोलीस प्रमुखांकडे शिष्टमंडळ कैफियत मांडणार आहे. शहरातील साईबाबा मंदिर सभागृहात बुधवारी (२८ ऑक्टोबर २०२६) सायंकाळी सर्वपक्षीय बैठक पार पडली.

२२ ऑक्टोबर रोजी गोकुंद्रा येथील दुर्गादेवी विसर्जनाच्यावेळी वादाची ठिणगी पडली होती. प्रकरण पोलीस ठाण्यापर्यंत गेल्यानंतर काहींच्या मध्यस्थीने वाद निवळण्यात आला असला तरी पोलीस प्रशासनाने नोंद घेणे आवश्यक होते. वादावर पडदा पडल्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी रक्तरंजित राड्यातील दोन्ही बाजूंनी माजलेल्या दहशतीचा इतिवृतांत मान्यवरांनी या बैठकीत कथन केला. पोलिसांच्या उपस्थितीत हा जीवघेणा भ्याड हल्ला झाल्याने पोलीस निरीक्षकाच्या कार्यपद्धतीवर कडाडून आक्षेप सुद्धा बैठकीत घेण्यात आलाय.गोकुंद्यातील राड्यानंतर कायदा व सुव्यवस्थे बाबद उद्धवलेल्या परिस्थितीवर किनवट व गोकुंद्यातील मान्यवरांनी सामाजिक जाणीवेतून चिंता व्यक्त केलीय. किनवटचे माजी नगराध्यक्ष इसाखान सरदारखान, माजी बांधकाम सभापती व्यंकटराव भंडारवार, दिशा समतीचे माजी सदस्य मारोती सुंकलवाड यांनी बैठकीचे आयोजन केले होते. नगराध्यक्षा सौ.सुजाताताई येंड्रलवार, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानीवार, मराठवाडा जनता विकास परिषदेचे गंगन्ना नेम्मानीवार, पत्रकार के.मुर्ती, शिवराज राघुमामा, रा.काँ.चे वैजनाथ करपुडे, शिवराज चाडावार, फारुख शेख आदींनी पोलीस प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर सडकून टीका केली. शहरात रेती, मुरूम तस्करी, गुटखा, मटका तसेच गांजा, दारूसह इतर मादक द्रव्यांची अवैध विक्री यामुळे गुन्हेगारी वाढल्याचा मुद्दाही उपस्थित केला होता. पोलिसांच्या हप्तेखोरीमुळे वरील अवैध धंदे सुरू असल्याने गुन्हेगारांचे मनोधैर्य वाढत असल्याचा ठपका सदरहू बैठकीत ठेवण्यात आलाय. किनवट पोलीस ठाण्यात सक्षम पोलीस निरीक्षक आणि पुरेस्या मनुष्यबळाची नितांत आवश्यकता आहे तो कोरम पूर्ण करावा. किनवट शहराच्या बरोबरीनेच गोकुंदा शहराची लोकसंख्या असल्यामुळे तेथे ग्रामीण पोलीस ठाणे कार्यान्वित करावे, अशा ज्वलंत मागण्या घेवून मान्यवरांचे शिष्टमंडळ पोलीस महानिरीक्षकांसह नांदेडच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेण्यावर एकमुखी शिक्कामोर्तब करण्यात आलाय.

एटीएम कार्ड बदलले;ज्येष्ठ नागरिकाला १४ हजारांचा गंडा

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी येथील भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियांच्या एटीएम कार्डची अदला बदल करुन एका जेष्ठ नागरिकाच्या खात्यातून ९३ हजार ९९८ रुपये लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे, या प्रकरणी कुडंलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कुंडलवाडी येथील सेवा निवृत केंद्र प्रमख गंगाधर पोरडवार पेन्शन काढण्यासाठी एटीएम मध्ये गेले होते त्यांनी २० हजार रुपये काढले या वेळी मागे उभ्या असलेल्य अज्ञात व्यक्तीने त्यांचा पिन क्रमांक पाहून घेतला आणि रुपये मोजत असताना त्यांच्या एटीएम कार्डची अदला बदल केली रात्री मोबाईल वर आलेल्या बँकेचे संदेश तपासल्या नंतर खात्यातून ९३ हजार ९९८ रुपये काढल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने गंगाधर भूमन्ना पोरडवार यांनी २७ आक्टों. रोजी कुडंलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिल्याने कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुरन १२७/ २६ कलम ३१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एटीएम वापरताना सावधगिरी बाळगा असे आहवान स.पो.नि. ज्ञानेश्वर शिंदे यांनी केले आहे.

राज्यात अवकाळी पावसाचा इशारा

मुंबई/प्रतिनिधी-अर्णव चक्रीवादळाच्या प्रभावामुळे देशातील अनेक भागांत पावसाने हजेरी लावली असून, महाराष्ट्रातही हवामान बदलण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी राज्यातील काही जिल्ह्यांत मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावेळी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचे वारे वाहण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नाशिक तसेच विदर्भातील काही भागांत पावसाची शक्यता आहे. कोकण, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्येही हवामानात बदल होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज आहे. अमरावती शहरासह ग्रामीण भागात बुधवारी रात्रीपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. त्यामुळे उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. पुढील दोन ते तीन दिवस पावसाचे वातावरण राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मलकागुडा शिवारात विहिरीत पडून जंगली रोह्याचा मृत्यू

सरफराज दोसानी

माहूर : माहूर तालुक्यातील गोंडवडसा परिमंडळांतर्गत तुळशी बिटमधील मलकागुडा शिवारात एका जंगली रोह्याचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. जंगलातील जलस्रोत आटत असल्याने वन्यप्राण्यांची पाण्यासाठी भटकंती वाढली असून, ते गावालगतच्या शेतशिवारांकडे वळत असल्याचे या घटनेच्या निमित्ताने पुन्हा समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलकागुडा शिवारातील शेतकरी वसंत नारायण तुमराम यांच्या शेतातील विहिरीत मंगळवार, दि.२७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास एक जंगली रोही पडल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ दूरध्वनीद्वारे वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच वनरक्षक ज्ञानेश्वर मालेकर यांनी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घटनास्थळी भेट दिली. मात्र, सायंकाळ झाल्यामुळे रोह्याला विहिरीतून बाहेर काढणे शक्य झाले नाही. विहिरीतील पाण्यात बुडाल्याने रोह्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. बुधवार, दि.२८ ऑक्टोबर

रोजी वनपाल साजिद अली, वनरक्षक ज्ञानेश्वर मालेकर तसेच माहूरचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राजगुरू, तुळशी येथील डॉ. हंबर्डे, वानोळा येथील डॉ. कृष्णा चव्हाण आणि आष्टा येथील डॉ. बरगे यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर जेसीबीच्या साहाय्याने मृत रोह्याला विहिरीतून बाहेर काढण्यात आले आणि त्याचे शवविच्छेदन करण्यात आले. या कामासाठी हिवळणी येथील शंकर राठोड, श्रीकांत सिडाम, जीवन राठोड, आनंदराव बोडलवार, सुनील तुमराम, केशव पवार, संजय तुमराम यांच्यासह स्थानिक नागरिकांनी सहकार्य केले. यंदा अल्प पावसामुळे डोंगरावरील जलाशय पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. परिणामी, जंगलातील नैसर्गिक जलस्रोत कोरडे पडत असून, वन्यप्राण्यांना पाण्यासाठी भटकँती करावी लागत आहे. फेब्रुवारी २०२६ पासून ऑक्टोबर महिना संपत आला तरी उन्हाचा तडाखा कायम असल्याने जंगलातील पाणीसाठ्यांवर परिणाम झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे वन्यप्राणी डोंगरपायथ्यावरील शेतशिवारांमध्ये आणि मानवी वस्त्यांजवळ येत असल्याचे दिसून येत आहे.माहूर तालुक्यासह परिसरातील जंगलात बिबट्या, लांडगा, वानर यांसह विविध वन्यप्राण्यांचा वावर आहे. पाण्याच्या शोधात हे प्राणी गावांकडे वळत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही निर्माण होत आहे. वाई बाजार परिसरात तर वानरांच्या उपद्रवाने नागरिक त्रस्त झाले आहेत. रस्त्यांवर आणि घरांवर वानरांच्या टोळ्यांचा वावर वाढल्याने नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पूर्णेकर हत्या प्रकरणी अखेर मीनाक्षी शिंदेंचा राजीनामा

ठाणे: ठाकरे गटाच्या शिवसेनेचे ठाण्यातील विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणाला एक महिना पूर्ण झाला असताना, शिवसेनेच्या ठाणे जिल्हा महिला आघाडी प्रमुख मीनाक्षी शिंदे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपल्या पदाचा राजीनामा सुपूर्द केला आहे.

या प्रकरणात मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांच्या अटकेची मागणी पूर्णेकर कुटुंबीयांकडून केली जात आहे. या दोघांची पोलिसांकडून चौकशीही करण्यात आली होती. मीनाक्षी शिंदे यांनी एकनाथ शिंदे यांना



लिहिलेल्या पत्रात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. समाजमाध्यमांवर तसेच पक्षपातळीवर आपल्या विरोधात आरोप-प्रत्यारोप सुरू असून, विविध पक्षांकडून आरोप करून पक्ष नेतृत्वावर दबाव आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. ज्या प्रकरणाशी आपला संबंध नाही, त्यामध्ये आपले नाव जोडले जात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.आपण आजवर पक्षाचे निष्ठेने काम केले असून, आपल्या नेतृत्वाची आणि पक्षाची प्रतिष्ठा जपण्यासाठीच राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे मीनाक्षी शिंदे यांनी पत्रात नमूद केले आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून मीनाक्षी शिंदे यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसून, त्यांनी स्वतःहून राजीनामा दिल्याचे सांगितले जात आहे. त्या ठाणे महापालिकेच्या नगरसेविका म्हणून कार्यरत राहणार आहेत. तसेच, त्यांच्याकडे पक्षाच्या लाडकी सून अभियानाचे पदही आहे. त्यांचे पती राजेंद्र शिंदे हे मानपाडा विभागाचे विभागप्रमुख आहेत.

धर्माबाद नगर परिषदेत निविदांचा खेळ की,नियमांचा मेळ?

निविदा काढल्या,कार्यादेश कुठे?;खरेदीचा हिशेब द्या,भाजप नगरसेवक आक्रमक

धर्माबाद/प्रतिनिधी- धर्माबाद नगर परिषदेच्या कारभारात पाणीपुरवठा साहित्य, विद्युत साहित्य, मनुष्यबळ पुरवठा आणि ब्लिचिंग पावडर या चार महत्त्वाच्या बाबींच्या वार्षिक निविदांवरून आता जोरदार प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. निविदा प्रक्रिया राबविण्यात आली, मात्र संबंधित कार्यादेश देण्यात आले होते का? कार्यादेश नसेल, तर खरेदी नेमकी कोणत्या आधारावर करण्यात आली? या प्रश्नांनी नगरपरिषदेच्या प्रशासकीय पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर आणला आहे.

आ.राजेश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नगरसेवकांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेत मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी खुलाशाची मागणी केली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदीची पुढील कार्यवाही कशी झाली, संबंधित पुरवठादारांना कोणत्या आधारे काम देण्यात आले. आणि सार्वजनिक निधीतून किती रकमेची बिले अदा करण्यात आली, याचा तपशील मागण्यात आला आहे. मागील आर्थिक वर्षापासून आजपर्यंतच्या निविदांच्या तारखा, निविदा क्रमांक, प्राप्त निविदांची संख्या, मंजुरीचा तपशील, खरेदी आदेश, पुरवठादारांची नावे, बिले, देयके आणि ब्लिचिंग पावडरच्या गुणवत्तेच्या नोंदी यांची माहिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. खरेदी झाली असेल, तर बिलांचा तपशील काय? या प्रश्नांची उत्तरे कागदपत्रांसह समोर येणे आवश्यक असल्याची भूमिका नगरसेवकांनी मांडली आहे. निविदा काढूनही कार्यादेश न देणे आणि त्यानंतर खरेदी करणे, या प्रक्रियेत नियमांचे पालन झाले होते का, याची स्पष्टता आवश्यक आहे. संबंधित कागदपत्रे आणि नोंदी तपासल्याशिवाय कोणताही निष्कर्ष काढता येणार नसला, तरी या चार निविदांबाबत प्रशासनाने सविस्तर खुलासा करणे महत्त्वाचे ठरणार आहे. या निवेदनावर भाजप गटनेते वर्णी नागभूषण,डॉ. कमलकिशोर काकांनी, सौ. केवळाबाई गड्डोड, अमित मुंदडा, उमेश झंवर, डॉ. रिंकूसुरकुटवार, चंद्रकांत कांचणे आणि छाया हंपोले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. जनतेच्या पैशाचा हिशेब जनतेला मिळणार का? चार वार्षिक निविदांबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांवर मुख्याधिकारी काय उत्तर देतात, निविदा व खरेदीची कागदपत्रे समोर येतात का आणि ब्लिचिंग पावडरच्या गुणवत्तेच्या नोंदी काय सांगतात, याकडे आता धर्माबादकरांचे लक्ष लागले आहे.-

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून डॉ.प्रतापसिंह पाटील १८ हजार मताधिक्यांनी विजयी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी-विधान परिषदेच्या ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील हे १८ हजार १२४ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांना ८५ हजार ८७६ मते मिळाली, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार सतीश भानुदासराव चव्हाण यांना ६७ हजार ७५२ मते मिळाली.

पसंतीक्रमानुसार ३९ उमेदवारांची वगळणी व मतहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अंतिम मतमोजणीत डॉ. पाटील यांनी सर्वाधिक मते मिळवली. भारत निवडणूक आयोगाकडून निकालासंदर्भातील पुढील

प्रक्रियेस मान्यता प्राप्त झाल्यानंतर गुरुवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजून १० मिनिटांनी निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी डॉ. पाटील यांना विजयी घोषित केले. निवडणूक निर्णय अधिकारी जी. श्रीकांत यांच्या हस्ते डॉ. प्रतापसिंह पाटील यांना विजयाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी निवडणूक निरीक्षक श्रीमती माधवी खोडे-चवरे, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथील चिकलठाणा एमआयडीसी परिसरातील रेसोनेट लॉजिस्टिक्स एलएलपी येथे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत व निवडणूक निरीक्षक श्रीमती माधवी खोडे - चवरे यांच्या देखरेखीखाली मतमोजणी पार पडली. छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व धाराशिव या आठ जिल्ह्यांतील ८४२ मतदान केंद्रांवर झालेल्या या निवडणुकीत ४१ उमेदवार रिंगणात होते. मतमोजणीसाठी ७० टेबलांची व्यवस्था करण्यात आली होती. मतमोजणीच्या प्रारंभी मतपत्रिकांची पडताळणी व वर्गीकरण करण्यात आले. त्यानंतर पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी तीन फेऱ्यांत पूर्ण करण्यात आली. पहिल्या फेरीत ७० हजार ५१९, तर दुसऱ्या फेरीअखेर एकत्रित १ लाख ४० हजार ५४३ मतपत्रिकांची मोजणी करण्यात आली.

पान १ वरुन

विधान परिषद निकालावरून...

उमेदवार सतीश चव्हाण यांच्या विरोधात अब्दुल सत्तार यांनी भूमिका घेतल्याचा आरोपही त्यांनी केला. अमरावतीत भाजपने युतीधर्म पाळून शिवसेनेला मदत केली आणि बंडखोरांवर कारवाई केली. मग पुण्यात धंगेकर यांच्यावर कारवाई का केली जाणार नाही, असा प्रश्न बन यांनी उपस्थित केला. विधान परिषद निवडणुकीतील निकालानंतर महायुतीतील घटक पक्षांमध्ये समन्वयाचा अभाव, उमेदवारीवरून निर्माण झालेली नाराजी आणि एकमेकांवर होणारे आरोप यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. पाचपैकी तीन जागा जिंकणाऱ्या महाविकास आघाडीच्या यशापेक्षा महायुतीतील अंतर्गत संघर्षाचीच चर्चा आता अधिक रंगू लागली आहे.

मतदार यादीतील घोळाविरोधात...

शमशेर खिच्ची, माजी नगरसेवक लक्ष्मीपती दोनपल्लीवार, वसंत राठोड, अ.खालिद गणीभाई, शे. शादुल्ला, जवाद आलम, शिवम राठोड, फारुख चव्हाण, सय्यद अनवर, माधव खेडकर, रविंद्र जोगदंडे, शेख सरफाज, शेख इसरत चिखलीकर, शेख जावेद चिखलीकर, सुरेश आडे बंदीकर, रमेश रेकुलवारांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मोर्चात सहभाग होता.

देगलूर नगरपरिषद

करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २६/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015341

जाहीरनामा

विक्रम विठ्ठलराव अंकमवार यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00010951 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/ वारसाच्या आधारे रमेश माधव कौरवार यांचे ऐवजी श्री.विक्रम विठ्ठलराव अंकमवार हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

देगलूर नगरपरिषद

करनिर्धारण विभाग
वारसाहक्काव्यातिरिक्त मालमत्तेचे हस्तांतरण
तारीख : २५/१०/२०२६
अर्ज क्रमांक : DEGL2627000015256

जाहीरनामा

लताबाई माधव देशमुख यांनी ज्यांचे मालमत्ता क्रमांक : DEGL00017759 हा आहे. त्यावर वाटणीपत्र/बातमीपत्र/खरेदीखत/ वारसाच्या आधारे कैलास बळीराम पाटील यांचे ऐवजी श्रीमती लताबाई माधव देशमुख हे नाव बदलण्याकरिता अर्ज सादर केला आहे. कोणास या प्रकरणी तक्रार असेल तर त्यांनी १५ दिवसांच्या आत या कार्यालयात लेखी तक्रार सादर करावी. मुदत संपल्यावर कोणत्याही प्रकारची सबब विचारात घेतली जाणार नाही व कायद्याप्रमाणे नाव बदलण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

स्वाक्षरित/-
देगलूर नगरपरिषद

जाहीर प्रगटन

४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,नांदेड यांच्या न्यायालयात
ईतर किरकोळ फौजदारी अर्ज क्र.१४६४/२०२६
विरुद्ध

अर्जदारः- शिला भ्र.आनंदा गजभारे वय ३० वर्ष धंदा घरकाम रा.धनेगाव ता.नांदेड जि.नांदेड
गैरअर्जदारः- ग्रामविकास अधिकारी ग्रा.पं.धनेगाव
दावा :- जन्म नोंदणी अधिनियम, १९६९ अंतर्गत अर्ज.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, अर्जदार शिला भ्र.आनंदा गजभारे वय ३० वर्ष धंदा घरकाम रा.धनेगाव ता.नांदेड जि.नांदेड याने या न्यायालयात त्यांचे नामे अभिजित आनंदा गजभारे व विद्या आनंदा गजभारे यांच्या जन्माच्या नोंदीबाबत आदेश होणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जामध्ये त्याने अभिजित आनंदा गजभारे व विद्या आनंदा गजभारे यांचा जन्म दिनांक १३/५/२०१४ व दि.४/८/२०१० रोजी मौजे धनेगाव येथे झाला असे नमुद केले आहे.

सदर अर्जदाराला अभिजित व विद्या गजभारे यांचे नावे जन्म प्रमाणपत्र देण्यासाठी जर कोणाचा आक्षेप असेल तर त्यांनी दिनांक १४/१२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणासही आक्षेप नाही असे समजून योग्य तो निर्णय दिला जाईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
लिपीक
४ थे फौजदारी न्यायालय, नांदेड

स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, नांदेड

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४